●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ११८ ●सोमवार, दि. २८ जुलै २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● Beed (Maharashtra) ● Year 5 ●Issue 118 ● Monday, 28 July 2025 ● RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ● Page 1 ● Pages 4 ●Price 3 Rs.

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. योगेश वाघीरे ९१४६७०२३२३ ८१४९८०००२०
-: पत्ता : - राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड, बीड.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

श्री.गंगाभारती कृपा
मो.7038389999
आदित्य फर्निचर मॉल
छत्रपती संभाजी महाराज चौक, बार्शी रोड, बीड

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## कोकेन, गांजा, हुक्का पॉट, दारु-बीयर, ४१ लाख अन् दोन मुली...

# खडसेंच्या जावयाच्या रेव्ह पार्टीमध्ये पोलिसांना काय काय सापडलं ?



**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील रेव्ह पार्टीमध्ये टाकण्यात आलेल्या धाडीमध्ये माजी मंत्री एकनाथ खडसे यांच्या जावयासह सात जणांवर कारवाई करण्यात आली. या प्रकरणी नेमकी काय कारवाई करण्यात आली आणि त्यामध्ये काय साडपलं याची माहिती पुणे पोलिसांनी दिली. पोलिसांनी या ठिकाणाहून कोकेन, गांजा, हुक्का पॉट आणि फ्लेवर, दारू आणि बीयरच्या बाटल्यांसह इतर काही साहित्य जप्त केलं आहे. तसेच पकडण्यात आलेल्या सात जणांवर एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत



कारवाई करण्यात आली आहे. रविवारी पहाटे साडे तीन वाजण्याच्या सुमारास सुमारास पुण्यातील खराडी भागातील स्टेबर्ड अझुर सुट याठिकाणी गुन्हे शाखेने ही कारवाई केली. आरोपींकडून ४१ लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. खराडी पोलिस ठाण्यात एनडीपीएस. ॲक्ट कलम ८ (क), २२ (ब) (११) अ, २१ (ब), २७ कोटपा ७ (२), २० २) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निखिल पिंगळे, पोलिस उपआयुक्त (गुन्हे) यांनी या कारवाईची माहिती दिली.

**● पोलिसांनी काय साहित्य जप्त केलं ?**

२.७ ग्रॅम कोकेन, ७० ग्रॅम गांजा, हुक्का पॉट आणि फ्लेवर, दारू आणि बीयरच्या बाटल्या, दहा मोबाईल, दोन चार चाकी गाड्या, ४१ लाख रुपये

▶▶ उर्वरित पान २ वर

# समाजाचा द्वेष झाला म्हणून आम्ही मात्र कुणाचाही द्वेष करणार नाही : धनंजय मुंडे

**संघर्ष आपल्या रक्तात ; तो शेवटपर्यंत करणार ; अस्मिता आणि गुणवत्तेवर आक्षेप घेणाऱ्यांनो, आता बास: मुंडेंचा इशारा**

**वंजारी समाजाच्या अधिवेशनात धनंजय मुंडे यांचे जोरदार भाषण**

**एकोप्याने राहून एकमेकांना सहाय्य करू : पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने**

**● अनेक मान्यवरांचा विशेष गौरव**

**ठाणे । प्रतिनिधी**

मी राजकारणात आणि सामाजिक जीवनात सक्रिय झाल्यापासून आजपर्यंत माझ्यावर अनेक संकटे, अनेक संघर्ष आले, त्यांना मी सामोरे गेलो. मात्र यावेळी सलग २०० दिवस माझी मीडिया ट्रायल चालवली गेली. मी, माझे



आई - वडील, माझी मुले - बाळे, माझी जात, माझा जिल्हा, माझी माती या सगळ्यांची बदनामी केली गेली. त्या सर्व बदनामीला मी संयमाने तोंड दिले. जात म्हणून अनेकांनी सातत्याने द्वेष भावनेने टीका टिप्पणी, आरोप केले. कुणी व्यक्ती दोषी असेल तर त्याला जरूर फाशी द्या, चुकीचे समर्थन कुणीच करणार नाही; समाज म्हणून तरीही आमचा ▶▶ उर्वरित पान २ वर

# स्मशानभूमी नसल्याने मृतदेह ठेवला नगरपरिषद कार्यालयाबाहेर

**अंबाजोगाईत लिंगायत समाज आक्रमक**

**बीड । प्रतिनिधी**

गावात स्मशानभूमी नसल्याने मृतदेहावर उघड्यावर अंत्यसंस्कार करण्यात येत असल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. असाच प्रकार अंबाजोगाईमध्ये होत असून जागा मिळण्याबाबत मागणी करून देखील लिंगायत समाजाला स्मशानभूमी मिळत नसल्याने समाज बांधव आक्रमक झाले आहेत. तर स्मशानभूमी नसल्याने मृतदेह थेट नगरपरिषद कार्यालयाबाहेर आणून ठेवला आहे. भारतीय जनता पार्टीच्या



आमदार नमिता मुंदडा यांच्या गावात (अंबाजोगाई) लिंगायत

▶▶ उर्वरित पान २ वर

# १३ वर्षानंतर राज ठाकरे 'मातोश्री'वर, उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त भेट, राजकीय भूकंपाचे संकेत?

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात नेहमीच अनपेक्षित घडामोडी घडत असतात, पण आज मुंबईत घडलेल्या एका घटनेने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांचे चुलत बंधू आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना भेटण्यासाठी वांद्रे येथील 'मातोश्री' निवासस्थानी हजेरी लावली.

उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त ही भेट झाली असली तरी, या भेटीमागे खोलवर राजकीय अर्थ दडलेले असल्याची



चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. विशेष म्हणजे, राज ठाकरे तब्बल १३ वर्षांनंतर 'मातोश्री'वर पोहोचले आहेत; यापूर्वी ते २०१२ मध्ये शेवटचे तिथे गेले होते.

१३ वर्षांचा राजकीय वनवास आणि पुनरागमन– राज ठाकरे यांनी २००६ मध्ये शिवसेनेतून बाहेर पडून 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना' स्थापन केली होती. तेव्हापासून ठाकरे बंधूंमधील राजकीय आणि वैयक्तिक मतभेद अनेकदा सार्वजनिकरित्या समोर आले होते. या १३ वर्षांच्या काळात दोन्ही पक्षांनी एकमेकांविरोधात अनेकदा कठोर भूमिका घेतल्या. मात्र, अलीकडच्या काही घडामोडींमुळे हे राजकीय अंतर कमी होत असल्याचे संकेत मिळत होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्र सरकारने इयत्ता पाचवीपर्यंत हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या निर्णयाविरोधात आणि मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर दोन्ही नेते एकाच व्यासपीठावर आले होते.

▶▶ उर्वरित पान २ वर

# पैशांसाठी सततचा छळ; विवाहितेने गळफास घेऊन केली आत्महत्येचा

**अंबाजोगाईतील घटना, पतीसह तिघांवर गुन्हा**

**अंबाजोगाई । प्रतिनिध**

घरखर्चासाठी माहेरहून पैसे आणावेत म्हणून सतत मारहाण व मानसिक छळ केल्यामुळे, अंबाजोगाईतील २० वर्षीय विवाहिता अनम शेख हिने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या तिघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. अनमचा भाऊ मुजफ्फर सिकंदर शेख यांच्या फिर्यादीनुसार,



अनम शेख हिचा विवाह २०२३ मध्ये गांधीनगर येथील सोहेल अफसर शेख याच्याशी झाला. विवाहावेळी मानपान, संसारोपयोगी वस्तू, व अंगावर सोन्याचे दागिने देण्यात आले होते. सध्या तिला पाच महिन्यांचा एक मुलगाही आहे. लग्नानंतर काही महिन्यांतच पती सोहेल शेख याला दारूचे व्यसन लागले. त्यानंतर त्याने व त्याच्या घरच्यांनी अनम हिचे दागिने मोडून घरखर्चासाठी वापरले. दागिने संपल्यावर माहेरून पैसे आणावेत म्हणून अनमवर सतत मानसिक व शारीरिक छळ सुरू झाला. तिचे पती सोहेल, दिर मझहर शेख

▶▶ उर्वरित पान २ वर

# सिरसाळ्यात नराधम पिसाटले

**शाळेतून घरी जाणाऱ्या विद्यार्थीनीचा विनयभंग**

**सिरसाळा । प्रतिनिधी**

महिला, मुलींच्या अत्याचारात वाढ होत आहे. मुली सुरक्षित राहिल्या नाहीत. अल्पवयीन मुलीवरील अत्याचार घटनात वाढ झाली आहे. अल्पवयीन मुलीवर बलात्काराची घटना ताजी असतांनाच सिरसाळ्यात आणखी एक मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. दि. २६ रोजी दुपारी १२: ३० वाजताच्या दरम्यान (वय १५ वर्षीय) विद्यार्थीनी शाळेतुन घरी जात असताना नराधम आरोपी शेख शिकंदर पाशा (वय ४५ रा. सिरसाळा) याने मला पाऊस लागत आहे. मला तुझ्या छत्रीमध्ये घे असे म्हणुन त्या पिडित मुलीच्या विद्यार्थिनीच्या छत्रीमध्ये जबरदस्तीने घुसुन तिच्या कमरेला धरुन जवळ ओढले व गळ्यात हात टाकुन 'माझ्यासोबत येतेस का' असे म्हणत विनयभंग केला. या प्रकरणी सिरसाळा पोलीस स्टेशन मध्ये पिडित विद्यार्थ्यांनीच्या वडिलांच्या फिर्यादीवरून पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक आनंद जाधव करत आहेत.

# बीड जिल्ह्यातील आंतरजिल्हा घरफोडी टोळी जेरबंद; तीन घरफोड्यांचे गुन्हे उघड

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात जानेवारी महिन्यात बर्दापुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या सलग तीन घरफोड्यांचे गूढ अखेर उकलण्यात स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांना यश आले आहे. मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत यांनी जिल्ह्यातील घरफोड्यांचे गुन्हे उघड करण्याचे स्पष्ट निर्देश



दिल्यानंतर विशेष तपास पथकाने तपासाची चक्रे फिरवली. सदर गुन्ह्यांमध्ये संबंधित आरोपींची नावे तांत्रिक बाबींवरून समोर आली होती. मात्र आरोपी फरार असल्याने त्यांचा शोध सुरु होता.

दिनांक २६ जुलै २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की बर्दापुर परिसरातील घरफोडी करणारे आरोपी माने कॉम्प्लेक्स, बीड येथे थांबले आहेत. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ कारवाई करत झडप टाकून आरोपींना अटक केली. अटक करण्यात आलेले आरोपी शेख इरफान मुनीर (वय २१) आणि

▶▶ उर्वरित पान २ वर

# अल्पवयीन मुलीस 13 महिन्यात तीनदा उचलून नेऊन जंगलात बांधले

**बीड । प्रतिनिधी**

घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन तरुणीला अज्ञात तरुण उचलून नेऊन जंगलात तिला झाडाला बांधून टाकतो. १३ महिन्यात तीनदा अशी घटना घडल्याने शिरूर तालुक्यात खळबळ उडाली आहे. याबाबत मुलीच्या पित्याने पोलिसांकडे रितसर तक्रार केली आहे.

मुलीच्या पित्याच्या माहितीनुसार याआधी दोन वेळेस अशीच घटना घडली. पहिली घटना २७ जून २०२४ रोजी, दुसरी घटना १७ ऑगस्ट २०२४ रोजी तर तिसरी घटना काल २६ जुलै २०२५ रोजीच्या सकाळी पुन्हा ही घटना

▶▶ उर्वरित पान २ वर

स्वराज सोलार
ॲण्ड वॉटर सोल्युशन
प्रो.प्रा.अजय भोसले
9673798477
8830127742

# उंच गणेशमुर्त्यांचे विसर्जन व्यवस्थितच व्हायला हवे !

सार्वजनिक गणेशमूर्ती विसर्जनाबाबत अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला निर्णय उच्च न्यायालयाने अखेर दिला आहे. नवीन निर्णयानुसार ६ फुटांपर्यन्तच्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत करणे बंधनकारक असणार आहे, तर ६ फुटांपेक्षा अधिक उंची असलेल्या गणेशमूर्त्या समुद्र आणि नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. गणेशोत्सव हा मुंबईतील सर्वांत मोठा उत्सव. गणेशोत्सव काळात गिरगाव, लालबाग आणि परळ या भागांत रात्रीचा दिवस झालेला असतो. सर्वत्र विद्युत रोषणाईचा झगमगाट आणि गणेशभक्तांची वर्दळ या दहा दिवसांत दिसून येते. भक्ती आणि जल्लोष यांचा संगम असलेला हा उत्सव पाहण्यासाठी, त्याचा आनंद लुटण्यासाठी आणि मनात त्याच्या आठवणी कायमच्या कोरण्यासाठी हजारो विदेशी पर्यटक या दिवसांत मुंबईत दाखल होतात. गणेशभक्तांना आकर्षित करण्यासाठी मुंबईतील अनेक मंडळांत उंच गणेशमूर्ती आणण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे. काही मंडळे सजावटीवर अधिक खर्च न करता मंडळात केवळ उंच मूर्ती बसवण्यावर भर देतात. मुंबईतील हा उत्साह पाहून गेल्या काही वर्षांपासून समुद्र किनारा लाभलेल्या मुंबई बाहेरील जिल्ह्यांतही उंच मुर्त्या बसवण्यात येऊ लागल्या आहेत. गणेशमुर्त्यांच्या उंचीबाबत बाजूबाजूच्या मंडळांमध्ये दरवर्षी स्पर्धा रंगलेली पाहायला मिळते. वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्या यांमध्ये या उंच मुर्त्यांची छायाचित्रे झळकत



असल्याने त्या जवळून पाहण्यासाठी गणेशभक्त मित्रमंडळी आणि नातेवाईकांसह दिवस-दिवसभर रांगेत उभे राहतात. १० दिवस मंडपात राजासमान विराजमान झालेल्या श्री गणेशमूर्ती विसर्जनाचा दिवस जेव्हा येतो तेव्हा तिला समुद्रापर्यंत नेण्यासाठी कार्यकर्त्यांना चांगलीच कसरत करावी लागते. रस्त्यातील अडथळे आणि गर्दीतून वाट काढत श्रींची मूर्ती समुद्रापर्यंत आणताना त्यांची चांगलीच दमछाक होते. उंच गणेशमूर्त्या खरेतर खोल समुद्रात विसर्जित करणे अपेक्षित असते; मात्र अनेक मंडळे विसर्जनाच्या वेळी मुर्त्या अर्ध्या पाण्यात अक्षरशः ढकलून पाडतात. त्या बुडण्यासाठी कार्यकर्ते मुर्त्यांवर उभे राहतात. त्यांचे पूर्णपणे विसर्जन झाले कि नाही याकडे मागे वळून न पाहता तिथून पळ काढतात. तर काही मंडळे उंच मुर्त्या तशाच अर्धवट पाण्यात सोडून निघून जातात. ओहोटीच्या वेळी पाणी किनाऱ्यापासून दूर गेल्यावर या मुर्त्या समुद्र किनाऱ्यावर तशाच उभ्या असलेल्या दिसून येतात. अनेक मुर्त्यांचे भग्न अवशेष किनाऱ्यावर आलेले पाहायला मिळतात. ज्या गणेशमूर्तीमध्ये प्रत्यक्ष श्रीगणेश विराजमान आहेत या भावाने आपण १० दिवस तिची मनोभावे पूजा करतो, त्या मूर्तीची विसर्जनाच्या वेळेस होणारी अवहेलना कोणत्याही गणेशभक्तांच्या डोळ्यात पाणी आणणारी असते. लक्षावधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या लालबागच्या राजा गणेशोत्सव मंडळातील श्रीच्या मूर्तीचे विसर्जन दरवर्षी तराफांच्या साहाय्याने खोल समुद्रात केले जाते. तो दिव्य सोहळा पाहताना आणि बाप्पाला निरोप देताना अनेकांच्या डोळ्याचे पारणे फिटते. जर लालबागच्या राजा मंडळाच्या उंच मूर्तीचे विसर्जन खोल समुद्रात केले जाऊ शकते तर इतरांना ते का शक्य नाही. आणि ज्यांना उंच गणेशमूर्त्यांचे विसर्जन विधिवत आणि भावपूर्ण करता येत नसेल अशा मुर्त्यांनी उंच गणेशमूर्त्या बसवून श्रीगणेशाची अवहेलना तरी करू नये. श्रीगणेशमूर्ती ही सजावटीची किंवा देखाव्याची वस्तू नव्हे, जी दहा दिवस सजवून मंडपात बसवली आणि अनंत चतुर्दशीला समुद्रावर सोडून दिली. गणेश भक्तांच्या श्रद्धेमुळे गणेशोत्सवादरम्यान गणेशमुर्तीमध्ये श्री गणेशाचे तत्व मोठ्या प्रमाणात अवतरित झालेले असते त्यामुळे त्या मूर्तीचा योग्य तो आदर-सन्मान राखला जायला हवा. तिचे विसर्जन शास्त्रशुध्दच व्हायला हवे अन्यथा श्री गणेशाच्या कृपेपेक्षा अवकृपेसच आपण पात्र होऊ.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

# पिकविम्याचे सुरक्षा कवच

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाच्या होणाऱ्या नूकसानीपासून शेतकऱ्यांस आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. देशातील २३ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्याना आत्तापर्यंत पिक विम्याचा लाभ मिळाला आहे. १.७५ लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त दाव्यांचे अधिदान करण्यात आले. ७८ शेतकऱ्यांना कोटी पेक्षा जास्त शेतकरी योजनेत सहभागी झाले आहेत.

योजनेची ठळक वैशिष्टे : खरीप हंगाम विमा योजनेत भाग घेता येणारी पिके: भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल.

महत्वाच्या बाबी : योजनेत सहभागासाठी अंतिम मुदत दि. ३१ जुलै २०२५ आहे. या योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा ग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई-पीक पाहणी बंधनकारक आहे. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे. ई-पीक पाहणी आणि विमा घेतलेले पिक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल आणि भरलेला विमा हप्ता जप्त केला जाईल.

विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी (सीएससी) विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत (सीएससी) विभागास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क (सीएससी) चालक यांना देऊ नये. एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही. मंजूर नुकसान भरपाई अर्जदार यांचे आधार सलग्न बँक खात्यात थेट केंद्र शासन पोर्टल वरून जमा करण्यात येणार आहे. सर्व पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के आहे.

उंबरठा उत्पादन:- अधिसूचित क्षेत्रातील, अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षातील सर्वाधिक उत्पादनाची पाच वर्षाचे सरासरी उत्पादन गुणीले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाते.

विमा संरक्षणाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत : पिक पेरणीपासून काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक, कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पिक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळ साठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळ मधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना सम प्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे.

योजना राबविणाऱ्या विमा कंपनीचे नाव व संबंधित जिल्हे पुढीलप्रमाणे आहेत :

१) भारतीय कृषी विमा कंपनी, मुंबई -अहमदनगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा, वाशीम, बुलढाणा, सांगली, नंदुरबार, परभणी, वर्धा, नागपुर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, जालना, गोंदिया, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली जिल्हे समाविष्ठ आहेत. २) आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शुरंस कंपनी, पुणे - लातूर, धाराशिव, बीड हे जिल्हे समाविष्ठ आहेत.

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांस देखील या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान सात दिवस संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे. बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड व पिक पेरणीचे स्वयं घोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देवून व हप्ता भरुन सहभाग घ्यावा. या शिवाय कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) आपले सरकारच्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा .षिलू.सीं.ळप या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. भाग घेतलेल्या शेतकऱ्याने नंतर ई-पीक पाहणी नोंद पूर्ण करावी.

◆ पान ४ वरून पुढे...

## सांगा आम्हाला...

वरिष्ठ स्तरावरून कळवले असल्याचे प्रभारी मुख्याध्यापक धन्वे निरंजन यांनी सांगितले.

पावसाळ्यात शिक्षक आणि मुलांना झाडु आणि सुपलीने पाणी काढावे लागते ? विद्यार्थी आनंददायी शिक्षण कसे घेणार ? : चव्हाण तारा ( शिक्षिका)

पत्रे ठिकठिकाणी गळके असल्याने पावसाळ्यात वर्गात पाणी साचते. वर्गात आल्या बरोबर झाडु आणि सुपली हातात घेऊन वर्गात साचलेले पाणी बाहेर काढावे लागते. भेगा पडलेल्या भिंती अशा धोकादायक वातावरणात आनंददायी शिक्षण कसं होणार ? असा उद्विग्न प्रश्न शाळेतील शिक्षिका तारा चव्हाण यांनी उपस्थित केला आहे.

आंदोलने करूनही प्रशासनाला गरीबांच्या लेकरांच्या शिक्षणाचं सोयरसुतक नाही : हरिभाऊ शेळके ( सामाजिक कार्यकर्ते) वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरावस्थेबाबत सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ शेळके यांनी २-३ वेळा आंदोलने केली. मात्र दुरूस्तीच्या नावाखाली बाह्य रंगरंगोटी केली जाते. जाधव वस्ती,कोलगुडे वस्ती, शेलार वस्ती,कोटुळे वस्ती,बजगुडे वस्ती येथील २-३ किलोमीटर वाड्या वसत्यावरून शिक्षणासाठी आलेल्या गोरगरिबांच्या लेकरांच्या शिक्षणाचे शासन आणि लोकप्रतिनिधींना सोयरसुतक नसल्याची संतप्त प्रतिक्रिया हरिभाऊ शेळके यांनी दिली.

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्ह्यातील ३८१ शाळांमध्ये ६०७ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे.शिक्षण विभागाने यासाठी १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव नियोजन समितीकडे दिला असुन ग्रामीण भागातील शेतकरी, ऊसतोड मजुर, गोरगरिबांच्या लेकरांचे शिक्षण जीव मुठीत घेऊन धोकादायक ईमारतीमधुन होत असुन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी नियोजन समितीच्या निधीतुन १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी यासाठी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्रशासनाला दिले आहे.

## गंगावाडी खून...

केल्या नंतर त्यांना प्रथम पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती.दरम्यान आरोपीची कसून चौकशी करून यामध्ये अजून कोणाचा सहभाग आहे का याचा तपास पोलिस करत असून दिनांक २७ जुलै रोजी या आरोपींना न्यायालयासमोर हजार केले असता न्यायालयाने या पाच हि आरोपींची कारागृहात रवानगी केली आहे.याप्रकरणी अधिक तपास सपोनी मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय स्वप्नील कोळी,कैलास अन्नलदास, बिट अंमलदार काकडे हे करत आहेत.

◆ पान १ वरून पुढे...

## कोकेन, गांजा...

### ● अटक करण्यात आलेल्या सात आरोपींची नावे

प्रांजल मनिष खेवलकर(४१), निखिल जेठानंद पोपटाणी (३५), समीर फकीर महमंद सय्यद (४१), सचिन सोनाजी भोंबे (४२), श्रीपाद मोहन यादव (२७), ईशा देवज्योत सिंग (२२), प्राची गोपाल शर्मा (२२)

पोलिस उपायुक्त म्हणाले की, पुढील तपास सुरू आहे. न्यायालयीन प्रक्रिया असल्याने इतर बाबी या तपासाअंती समोर येतील. आरोपींचे मेडिकल केलं आहे, त्याच्या काही बाबी समोर येतील. या पार्टीमध्ये अजून कुणी येणार होतं का याचा तपास सुरू आहे. कुठलीही गोष्ट अधांतरी समोर येणार नाही. सर्व गोष्टी या तपासाअंती समोर येतील.

राज्यात एकीकडे हनी ट्रॅपवरून राज्यात वादंग सुरू आहेत, त्यात आता रेव्ह पार्टीवरून दुसरं वादळ निर्माण झालं. पुण्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांनी छापा टाकला. या रेव्ह पार्टीवरील कारवाईत एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे.

उच्चभ्रूंची वस्ती असलेल्या खराडीत एका फ्लॅटमध्ये ही रेव्ह पार्टी सुरू होती. पार्टीत ५ पुरूष आणि २ महिलांचा समावेश होता. पार्टीत अंमली पदार्थ, दारू, हुक्का यांचं सेवन सुरू होतं. हाउस पार्टीच्या नावाखाली ही रेव्ह पार्टी सुरु होती.

या ड्रग पार्टी प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांमध्ये एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांचाही समावेश आहे. खराडी पोलीस ठाण्यात या सर्व ७ जणांवर गुन्हा दाखल झालाय. अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ प्रतिबंध कायद्याअंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आलेत. पुणे पोलिसांकडून सातही जणांची चौकशी सुरू आहे.

## समाजाचा द्वेष...

जो द्वेष केला त्याला मात्र आम्ही द्वेषाने उत्तर देणार नाही. आम्हाला स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब, स्व. पंडित अण्णा मुंडे यांनी सर्वसमावेशक कार्याची शिकवण दिलेली आहे. उलट आज जे जात म्हणून द्वेष करत आहेत, उद्या त्यांनीच आपल्याला सन्मानाची भावना व्यक्त करावी, असे काम एकत्रितपणे करून दाखवू, अस प्रतिपादन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी ठाणे येथील कार्यक्रमात बोलताना केले आहे.

ठाणे शहरातील टीप टॉप प्लाझा येथे सकल वंजारी समाजाच्या वतीने वंजारी समाज अधिवेशन व विचार मंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते; या प्रसंगी श्री. मुंडे बोलत होते. यावेळी मागील २०० दिवस कोणत्याही गोष्टीवर व्यक्त न झालेल्या धनंजय मुंडे यांनी आज आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

मी स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांचा संघर्ष अगदी जवळून पाहिला व अनुभवला आहे. मुळात संघर्ष हा आपल्या रक्तात आहे व तो आपण शेवटपर्यंत आवश्यकता असेल तिथे करत राहू, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

◆ पान १ वरून पुढे...

या काही महिन्यांच्या काळात अतिशय शांत राहून मी विरोधकांना उत्तर दिले नाही, सर्वजण म्हणायचे धनंजय प्रत्युत्तर का देत नाही, मात्र मी मनाशी ठरवले होते की प्रत्युत्तर द्यायचे नाही. पण काहींनी याचा गैरफायदा घेत आमच्या अस्मिता दुखावल्या. काहींनी तर गुणवत्तेवर आधारित नोकऱ्या मिळवलेल्या अधिकारी कर्मचारी यांची जात काढून त्यांना टोकाचा त्रास दिला, अगदी शासनाचे धोरण असलेल्या बिंदू नामावली वरून सुध्दा टार्गेट केले गेले, तेही सहन केले, मात्र आमच्या अस्मिता आणि गुणवत्तेवर आक्षेप घेणाऱ्यांना सांगतो, आता बास! यापुढे सहन करणार नाही; अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी अनभिक्षिप्त इशारा दिला आहे.

या अधिवेशनाच्या माध्यमातून समाजातील गुणवत्तेच्या आधारावर आपल्या जीवनात उच्च पद प्राप्त करून प्रशासकीय सेवा, वैद्यकीय सेवा, पत्रकारिता, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिमानास्पद कामगिरी करून दाखवली, त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रशासकीय सेवेत प्रधान सचिव म्हणून उत्तम कामगिरी करणाऱ्या सुमंत भांगे यांच्याबाबत बोलताना धनंजय मुंडे यांनी मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा जो शासन निर्णय राज्य सरकारने घेतला, तो स्वतः सुमंत भांगे यांनी ड्राफ्ट केलेला होता, याचाही आवर्जून उल्लेख श्री. मुंडे यांनी केला.

ज्याला जातीयवाद करायचा त्यांना खुशाल करू द्या, आपण मात्र कधीही कुणाची जात पाहून काम करणार नाहीत. स्व. मुंडे साहेब व स्व. पंडित अण्णा मुंडे यांनी सर्वसमावेशक कामाची शिकवण दिली, त्यातून वाटचाल करत असताना आजवर जात पाहून मी कधी राजकारण केले नाही, ज्या दिवशी जात पाहून राजकारण करण्याची वेळ येईल, त्यादिवशी राजकारण सोडून देईन, असेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले. या वाईट काळात सातत्याने समाजाने माझ्या पाठीशी खंबीर ताकत उभी केली, माझ्या कातडीचे जोडे करूनही मी ते ऋण फेडू शकणार नाही. आपली परंपरा व अस्मिता जोपासण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षा करणाऱ्या मुलांना मोठ्या शहरांमध्ये वसतिगृहे व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री यांनी आपल्याला सूचना केलेली असून, त्यासाठी कुणाकडेही मागणी करणार नाही, आपला हक्क आपण मिळवू, असे ठाम मत यावेळी मुंडेंनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनीही मार्गदर्शन केले. वंजारी समाज आज प्रगतीच्या वाटेवर असताना सर्वांना सोबत घेऊन चालावे. एकोप्याने राहून एकमेकांना शिक्षण आणि सदाचाराचा संदेश देऊ, असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

यावेळी व्यासपीठावर माजी प्रधान सचिव सुमंत भांगे, यांच्यासह प्रशासकीय सेवा, वैद्यकीय सेवा, शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, क्रीडा, साहित्य, संस्कृती इत्यादी क्षेत्रातील मान्यवरांचा तसेच यूपीएससी व एमपीएससी सह विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या नवनिर्वाचित अधिकाऱ्यांचा विशेष गौरव सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन आयोजक तथा भारतीय रेल्वे बोर्डाचे सदस्य धनराज गुट्टे यांनी केले, तर स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. अमोल गित्ते यांनी भूमिका बजावली. व्यासपीठावर माजी आ. संजय दौंड, लातूर जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, ज्येष्ठ नेत्या सुशीला ताई मोराले, धुळे महापालिकेचे माजी महापौर प्रदीप करपे, मीराबाई संस्थानच्या महंत ह. भ. प. राधा ताई सानप, आदिनाथ महाराज, पानेगावकर महाराज, यांच्या सह विविध पक्ष, संघटनेचे पदाधिकारी, आजी माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय सेवेतील अधिकारी आदी उपस्थित होते.

## स्मशानभूमी नसल्याने...

समाजाला स्मशानभूमी नसल्याचे समोर आले आहे. यामुळे मृतदेह नगर परिषद कार्यालयासमोर ठेवल्याची गंभीर घटना घडली आहे. अंबाजोगाई शहरातील ही गंभीर घटना आहे. अंबाजोगाई शहरात लिंगायत समाजाला स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे मृतदेहाची अंत्यसंस्कारासाठी गैरसोय होत असते. यामुळे संतप्त नातेवाईकांनी अंबाजोगाई येथील नगर परिषद कार्यालयाच्या बाहेर मृतदेह ठेवून आपला निषेध व्ये केला. त्या जागेवर अंत्यसंस्कारासाठी विरोध दरम्यान अंबाजोगाई येथील लिंगायत समाजाची स्मशानभुमि बाराखांबी परिसरात आहे. तेथील जागा पुरातत्व खात्याने अतिक्रमित केली आहे. त्यामुळे स्थानिक लिंगायत नागरिकांच्या अंत्यविधीसाठी आता जागा राहिली नाही. मृतदेह तेथे नेल्यास अंत्यविधी साठी विरोध केला जातो. यामुळे समाज बांधवानी आता आक्रमक भूमिका घेतली आहे.

रविवारी नगर परिषद कार्यालयासमोर ठेवला मृतदेह नगरपालिकेचे निवृत्त कार्यालयीन अधिक्षक कै. गणपत अप्पा वाघमारे (रा रविवारपेठ) यांचे पार्थिव रविवार असताना देखील नगर परिषद कार्यालयासमोर आणून लिंगायत बांधवांनी ठिय्या अंदोलन केले. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना किती त्रास सहन करावा लागतो, हे पुन्हा एकदा समोर आले आहे. प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढून लिंगायत समाजाला स्मशानभूमीसाठी योग्य जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## 13 वर्षांनंतर राज...

५ जुलै २०२५ रोजी वरळी येथील एनएससीआय डोम येथे आयोजित 'विजय रॅली'मध्ये उद्धव आणि राज ठाकरे एकत्र दिसले, ज्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे दिसू लागली. या रॅलीत दोन्ही नेत्यांनी मराठी अस्मितेबाबत एकजूट दाखवली आणि महाराष्ट्राच्या हिताला प्राधान्य देण्यावर भर दिला.

## पैशांसाठी सततचा...

आणि जाऊ तन्नो शेख यांनी तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा छळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

◆ पान १ वरून पुढे...

अनमच्या आई-वडिलांनी मध्यस्थी करत काही वेळा पतीला पैसेही दिले. मात्र तरीही छळ सुरूच राहिला. २६ जुलै रोजी सोहेल शेख याने तिच्या आईकडे ३०,००० रुपये वेल्डिंगच्या दुकानासाठी मागितले. पैसे न मिळाल्यामुळे तो संतप्त झाला होता...

त्यानंतर २७ जुलैच्या मध्यरात्री अनमच्या सासऱ्यांनी फोन करून सांगितले की अनमने विषारी औषध घेतले आहे. मात्र जेव्हा कुटुंबीय रुग्णालयात पोहोचले, तेव्हा डॉक्टरांनी सांगितले की तिने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

## बीड जिल्ह्यातील...

मुस्तफा कासिम पठाण (वय २७), दोघेही रा. अंबेडकर चौक, पानगाव, ता. रेणापूर, जि. लातूर येथील रहिवासी आहेत.

पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत आरोपींनी जानेवारी महिन्यात मौजे गिरवरी, जवळगाव व बर्दापुर येथे बंद घरांचे कुलूप तोडून घरफोडी केल्याची कबुली दिली असून त्यांनी त्यावेळी सोनं व रोख रक्कम चोरून नेल्याचे मान्य केले आहे. या कबुलीनंतर पोलीस ठाणे बर्दापुरच्या एकूण तीन घरफोडी प्रकरणांमध्ये गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदर आरोपी हे पूर्वीपासूनच कुख्यात गुन्हेगार असून त्यांच्या विरोधात विमानतळ पोलीस ठाणे, नांदेड येथे तीन गुन्हे, नांदेड ग्रामीण येथे एक गुन्हा, रेणापूर येथे एक गुन्हा आणि परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात देखील एक गंभीर गुन्हा दाखल आहे. या सर्व गुन्ह्यांचा स्वरूप दरोडा व चोरीसारखा असून आरोपी पोलीस अभिलेखावर पूर्वीपासूनच नोंदवले गेले आहेत.

ही यशस्वी कारवाई मा. श्री. नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा. श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई तसेच पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, स्था. गुन्हे शाखा, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली आहे. या कारवाईसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे, पोलीस हवालदार विकास राठोड, राहुल शिंदे, नितीन वडमारे, तसेच पोलीस अंमलदार आशपाक सय्यद, मनोज परजणे, नारायण कोरडे यांनी विशेष मेहनत घेतली. आरोपींना पुढील तपासासाठी पोलीस ठाणे बर्दापुरच्या ताब्यात देण्यात आले असून, पुढील तपास प्रभारी अधिकारी सपोनि श्री. ससाणे करत आहेत.

## अल्पवयीन मुलीस...

घडली. भयभीत मुलीला विचारले असता ती काहीच सांगत नाही. याआधीही आम्ही तिला अनेक वेळा विश्वासात घेऊन विचारण्याचा प्रयत्न केला. अखेर घटनेचे गांभर्य पणून शनिवारी सकाळी आम्ही पोलीस ठाण्यात आलो. सदरची घटना गंभीर असून प्रशासनाने याची गंभीर दखल घेत या प्रकरणाचा छडा लावावा, आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अल्पवयीन मुलीबाबत सदरची घटना घडत असल्याने गावासह परिसरामध्ये एकप्रकारे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 94 शाळांना ईमारत नाही , 607 वर्गखोल्यांची दुरूस्ती आवश्यक , 14 कोटी 85 लाखांचा प्रस्ताव नियोजनकडे: डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

दि.२५ जुलै शुक्रवार रोजी राजस्थानच्या झालावाड येथील सरकारी शाळेच्या वर्गाचे छत कोसळुन ३५ मुले दबली गेली त्यापैकी ७ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असुन या दुर्घटनेत जखमी झालेल्या २८ पैकी ९ मुलांची प्रकृती गंभीर जखमी आहेत. या घटनेमुळे मुलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असुन बीड जिल्ह्यातील शाळा इमारतींची अवस्था वाईट असुन ९४ शाळांना ईमारतच नाही तर ३८१ शाळांमधील ६०७ वर्गखोल्यांच्या दुरूस्तीची आवश्यकता आहे तर १४७ नविन वर्गखोल्या बांधकाम करणे गरजेचे आहे.यासाठी शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाख रूपयांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे दिला असुन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या ह्याला पाझर फुटेल काय ? आणि शाळांच्या भवितव्यांसाठी निधी



उपलब्ध करून देतील काय ? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

बीड जिल्ह्यात शाळा ईमारतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असुन धोकादायक मोडकळीस आलेल्या शाळांच्या ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा तसेच खोल्यांची दुरूस्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व सहका-यांनी लक्ष्यवेधी आंदोलने करून शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. धोकादायक इमारतींच्या भिंती,छत कोसळुन विद्यार्थी जखमी झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत.अनेक ठिकाणी ईमारत नसल्याने शाळा उघड्यावर, मंदिरात, चावडीत भरत आहेत.पावसाळ्यात पाऊस आल्यावर अनेकदा शाळांना सुट्टीही द्यावी लागते.

अजितदादा दिलेला वादा पाळतील काय ?शाळांच्या भवितव्यांसाठी डीपीसी मधुन निधी मिळेल काय ? ? डॉ.गणेश ढवळे

शाळांच्या दुरुस्तीसाठी आणि धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळांच्या नविन ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा यासाठी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वारंवार आंदोलने केलेली आहेत. पालकमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन निवेदन दिल्यानंतर अजितदादा यांनी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते ते पाळतील काय ? ?लोकभावना लक्षात घेऊन यावेळी जिल्हा नियोजन समितीमधुन शाळांसाठी भरीव निधी मिळेल अशी अपेक्षा असल्याने शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविलेला आहे. जिल्हा नियोजन समितीची बैठक होऊन अनेक दिवस उलटले असले तरी अद्याप शाळा दुरूस्ती आणि नविन ईमारतींचे नियोजन झालेले नाही. शाळा सुरू होऊन दीड महिना उलटला असुन दुरूस्तीच्या हालचाली नाहीत.पावसात विद्यार्थी जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करत असल्याने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गावात अनेक कामे करत असताना ईतर कामे थोडी बाजुला ठेवून लेकरांच्या भविष्यासाठी आवश्यक असलेल्या शाळा इमारतींसाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी विनंती डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.



*ना. पंकजाताई मुंडे यांच्या दिर्घ आयुष्य व यश किर्ती आणि वाढदिवसानिमित्य ड संगीता धसे यांनी सर्वेश्वर गणेशाला केला ११ हजार सहस्त्र आवर्तनाचा अभिषेक .*

# कॅश क्रेडिट कर्ज खाते संदर्भात दिलेला धनादेश न वटल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**



भारत मुकिंदराव मते यांनी मराठवाडा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड. यांच्याकडून ०३/०२जी२०१६ रोजी रक्कम रुपये पाच लक्ष कॅश क्रेडिट कर्ज घेतले होते. कॅश क्रेडिट कर्ज घेते वेळी आरपीने सदर कर्ज रक्कम व्याजासह करारान्वये परतफेड करणेची हमी दिल्याने तसेच कर्ज मागणी अर्ज करारपत्र जामीनदार पत्र हमीपत्र पगार तारन पत्र व इतर अन्य दस्तानची पूर्तता केली होती अशा अभिवचनावर मराठवाडा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड यांनी आरोपी भरत मुकुंदराव मते यांना कर्ज दिले होते. फिर्यादी बँकेने आरोपीस कर्ज रक्कम रुपये पाच लक्ष अदा करून आरोपीने कर्ज रक्कम रुपये पाच लक्ष कर्ज कराराच्या अटी व शर्तीनुसार कर्ज रक्कम व त्यावरील व्याजाची रक्कम नियमितपणे परतफेड न केल्याने व सदर कराराचे अटी शर्थीचा भंग केल्याने फिर्यादीने आरोपीस सदर कर्ज रक्कम भरणा करण्याची सूचना केली असता. आरोपीने त्यानंतर फिर्यादी बँकेत प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना सदर रक्कम भरणा करण्याची व्यवस्था तात्काळ करतो असे म्हणून फिर्यादीस आरोपीने त्याचे स्वतःचे बँक ऑफ इंडिया शाखा आनंदवाडी बीड या बँकेमधील खाते क्रमांक ०७६११०११०००४१२८ वरील दिनांक १५/०९/२०१८ रोजी चा रक्कम रुपये ७५०९९८ रुपये धनादेश क्रमांक ००००04 अदा करून सदर होऊन धनादेश नमूद तारखेस अथवा त्यानंतर धनादेश वटणे कमी बँकेत जमा केल्यास सदरचा धनादेश वटला जाईल असे आश्वासन व अभिवचन आरोपीने फिर्यादी बँकेस दिले. आरोपीचे आश्वासनावर विश्वास ठेवून येणे कर्ज थकबाकी रक्कम कोटी सदरचा धनादेश फिर्यादी बँकेने स्वीकारला आरोपीने दिलेला धनादेश फिर्यादीने सदरहून सदर धनादेश क्रमांक चार दिनांक १८/०९/२०१८ रोजी व वटणे कामी श्री गजानन नागरी सहकारी बँक शाखा बीड. येथे जमा केला असता सदाचा धनादेश खात्यावर अपुरी रक्कम या कारणावरून धनादेश न वाटता सूचनापत्रासह दिनांक १८/०९/२०१८ रोजी फिर्यादीस परत मिळाला त्यानंतर फिर्यादी बँकेने सदर धनादेशाबाबत आरोपीस रक्कम मागणी ची नोटीस दिनांक २५/०९/२०१८ रोजी त्यांचे वकीलामार्फत आरोपीस पाठवले सदाचित नोटीस आरोपीस ०५/१०/२०१८ रोजी मिळाली सदरची नोटीस आरोपीस मिळून देखील आरोपीने सदरची रक्कम विहित मुदतीत भरली नाही. त्यामुळे फिर्यादी बँकेने आरोपी विरुद्ध मा. मुख्य न्यायदंडाधिकारी बीड यांच्या न्यायालयात कलम १३८ निगोशिएबल इन्स्टुमेंट प्रमाणे प्रकरण दाखल केले. सदर प्रकरणांमध्ये प्रकरण दाखल झाल्यानंतर आरोपीस समन्स प्राप्त झाल्यानंतर आरोपी विधीज्ञ बाळासाहेब गायकवाड यांच्यामार्फत सदर प्रकरणात हजर झाले. सदर प्रकरणांमध्ये फिर्यादी बँक यांनी दोन साक्षीदार तपासले सदर प्रकरणात बँकेतर्फे कर्ज वसुली अधिकारी जालिंदर उत्तमराव गवळी व कार्यकारी अधिकारी शिवाजी भगवानराव देसाई फिर्यादी बँके तर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचा उलट तपास आरोपीच्या वकील मार्फत घेण्यात आला आरोपी तर्फे घेण्यात आलेल्या बचावा व उत्तम युक्तिवाद अंती सदर प्रकरणातून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली

आरोपीतर्फे विधिज्ञ बाळासाहेब केशवराव गायकवाड यांनी काम पाहिले तसेच त्यांना सहकार्य विधीज्ञ श्याम शिंदे विधीज्ञ सागर नाईकवाडे विधीज्ञ त्रिंबक जाधव विधीज्ञ लव बागलाने विधीज्ञ गणेश शिंदे यांनी सहकार्य केले.

# क्रांती महिला असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मनरेगाच्या कामात महिलांचा सहभाग व रोजगार निर्मिती कार्यक्रम संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

क्रांती महिला असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मनरेगाच्या कामात महिलांचा सहभाग व रोजगार निर्मिती तसेच महिला कार्यकर्त्यांना प्रशिक्षण कार्यक्रम ठेवण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती कुटे मॅडम नायब तहसीलदार गेवराई तर प्रमुख पाहुणे विलास मगरे सर विभागीय समन्वयक (कोरो इंडिया), आप्पासाहेब कानगुडे नगरसेवक गेवराई,श्रीमती शारदा डोईजड मॅडम,श्री मनोहर चाळक साहेब सामाजिक कार्यकर्ते गेवराई,एडवोकेट संदेश पोतदार साहेब,बंडू खरात,अनिल आबा मस्के रोजगार सेवक हे होते.



महात्मा गांधी रोजगार हमी योजने मध्ये ग्रामीण भागातील महिलांचा सहभाग या आधारे त्यांना रोजगार मिळवून देऊन त्यांना त्यांच्या संसारात आर्थिक आधार मिळवुन देण्यास व रोजगार देण्यास ग्राम पंचायत कडे नमुना नंबर ४ मध्ये अर्ज कसा करायचा याबद्दल सविस्तर माहिती दिली.पंचायत समिती कडून सरकारी नियमानुसार शंभर दिवस रोजगाराची हमी असल्यामुळे ज्यांना रोजगाराची आवश्यकता आहे अशा ग्रामीण भागातील महिला मजूर व इतरांना रोजगार मिळू शकतो याचीही माहिती व आपले हक्क आपले अधिकार याची माहिती दिली.महिला सक्षमीकरण व आर्थिक विकास याची सविस्तर माहिती श्रीमती शाहीन असलमखाँ पठाण यांनी सर्व महिलांना त्याची सविस्तर माहिती दिली.श्रीमती शारदा डोईजड मॅडम यांनी जमलेल्या महिलांना पीएम विश्वकर्मा योजना व पीएम किसान कौशल्य विकास योजना यांची सविस्तर प्रशिक्षण कसे प्राप्त करून घ्यावे व बँक लोन साठी कागदपत्राची पूर्तता कशी करावी याची माहिती दिली.श्रीमती कुटे मॅडम नायब तहसीलदार गेवराई यांनी आलेल्या महिलांना तहसीलच्या अनेक योजनाची सविस्तर माहिती दिली.श्री मनोहर चाळक सामाजिक कार्यकर्ते गेवराई यांनी जमलेल्या महिलांना प्रत्येक योजनेचा लाभ कसा घ्यावा व त्यासाठी आपली कुठेही अडवणूक झाली तर पूर्ण मदत करण्याची हमी व ते काम पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करण्याची हमी आपल्या भाषणातून व्यक्त केली आहे.श्री एडवोकेट संदेश पोतदार साहेब यांनी एकल महिला,विधवा महिला,दिव्यांग महिला यांना कोर्ट दरबारी कोणतीही अडचण निर्माण झाली तर त्यासाठी लागणारे कागदपत्र व कायदेशीर सल्ला देण्याचे आपल्या भाषणात व्यक्त केले आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.तुकाराम गवारे पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती शीतल गोचडे यांनी केले.

# वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम सावता महाराजांनी केले : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

साडेसातशे वर्षापासून प्रवाहित असलेल्या वारकरी संप्रदायाने समाजातील अनेक दोष दूर केले. माणसातली जळमटे दूर केली. समाजातील जातीभेद,हिंसा, द्वेष,भेदाभेद दूर करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले असून वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम संत सावता महाराजांनी केले असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकाराम महाराजापर्यंत आणि त्यानंतरही वारकरी संप्रदायाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. सर्व संतांमध्ये श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे वारकरी संप्रदायामध्ये कार्य अधिक महत्त्वाचे आहे. सावता महाराजांनी वारकरी संप्रदायात कर्म अर्थात कर्तव्याला अधिक महत्त्व आहे हे निक्षुण सांगितले. प्रपंचातून देखील परमार्थ साधता येतो. केवळ परमार्थासाठी यज्ञ,याग,तप करणे जरुरीचे नाही हे सांगितले. समाज कर्म प्रधान बनवला. कर्म हाच धर्म असे सांगून माणसाला क्रियाशील बनवण्याचे काम सावता महाराजांनी केले. वारकरी संप्रदायाला व्यवहार्य बनविण्याचे काम सावता महाराजांनी केले. प्रपंच करून परमार्थ साधता येतो आणि परमार्थ म्हणजे शुद्ध अंतकरणाने केलेले नामस्मरण.अशा नामस्मरणामुळे माणसाचे अंतकरण शुद्ध होते आनंदी होते आनंद म्हणजेच धर्म होय. इतकी सुस्पष्टता वारकरी संप्रदायांमध्ये सावता महाराजांनी आणलेली आहे असे ते म्हणाले. बीड येथील नव्याने उभारलेल्या श्री संत शिरोमणी सावतामहाराज मंदिर स्थळी ते दर्शनासाठी आले असता ट्रस्टींनी शहरातील प्रमुख लोकांना एकत्रित बोलावून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा संवाद कार्यक्रम घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंदिराचे जेष्ठ ट्रस्टी नामदेवराव दुधाळ हे होते. यावेळी ह.भ.प.अरुण डाके, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास बडगे,गणपत डोईफोडे, पत्रकार दिलीप ख्रिस्ती, नगरसेवक शुभम धूत, बाबुराव दुधाळ, विशाल घाडगे, दादासाहेब मुंडे, ड.सतिश शिंदे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्यामसुंदर घाडगे यांनी केले.

# पतीनेच पत्नीचे अश्लील फोटो काढले, अन् मग नातेवाईकांना...;

## धाराशिव जिल्ह्यातील खळबळजनक प्रकार

**धाराशिव । प्रतिनिधी**

पती-पत्नीच्या नात्याला काळिमा फासणारी घटना धाराशिव जिल्ह्यात घडली आहे. पतीनेच पत्नीला अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. इतकंच नव्हे तर फोटो व्हायरल करण्याची धमकी देत पत्नीला ब्लॅकमेल केलं असल्याचं समोर आलं आहे. धाराशिव तालुक्यातील येडशी गावात ही घटना घडली असून पतीविरोधात धाराशिव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित पत्नी संगीता शिंदे यांच्या तक्रारीनुसार, त्यांचे पती उत्तम शिंगे हा सतत पैशांसाठी त्रास देत होता. लग्न झाल्यानंतरच पत्नी आणि तिच्या माहेरच्यांकडे पैशांची मागणी करणाऱ्या उत्तमने आता थेट पत्नीचे अश्लील फोटो काढून, ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली आहे. इतकेच नव्हे तर, त्या अश्लील फोटोसह अनेक नातलगांनाही फोटो पाठवत,



पैशांची मागणी करण्यात आली. या त्रासाला कंटाळून पत्नी संगीता शिंदे यांनी थेट धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेतली आणि पतीविरोधात तक्रार दाखल केली

धाराशिव ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणी उत्तम शिंदेविरोधात गुन्हा दाखल केला असला, तरी अद्याप त्याला अटक झालेली नाही. एकीकडे महिला सुरक्षेचे दावे केले जात असताना, पतीकडून होणारा मानसिक छळ आणि ब्लॅकमेलिंग हा चिंतेचा विषय बनला आहे.

# पुढील चार वर्षात देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करू – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य सुविधांच्या दृष्टीने प्रत्येक तीन किलोमीटरमध्ये आरोग्यसेवांचे जाळे निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या चार वर्षांत देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. येत्या काळात सिकलसेल, थॅलेसिमिया, निमियावरील महागड्या उपचारासाठी एक नवीन योजना तयार करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.



लष्करीबाग येथील कमाल चौकात स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी अध्यक्षस्थानी तर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेच्या अध्यक्ष कांचन ताई गडकरी यांची विशेष उपस्थिती होती.आमदार संदीप जोशी, आमदार प्रवीण दटके, आमदार आशीष देशमुख, बेंगलूरू येथील महाबोधी सोसायटीचे महासचिव पुज्य भंते आनंद थेरा, नागपूर येथील रामकृष्ण मठाचे अध्यक्ष राघवेंद्र स्वामी, माजी मंत्री ॲड. सुलेखा कुंभारे, राजेश लोया, विशाखापट्टणम येथील एएमटीझेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जितेंद्र शर्मा,माजी महापौर दयाशंकर तिवारी, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, माजी आमदार गिरीश व्यास, माजी आमदार टेकचंद सावरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# बीडमध्ये गौरव महोत्सवाचे आयोजन

## साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे जयंतीची जय्यत तयारी

**बीड । प्रतिनिधी**

साहित्य, सामाजिक न्याय आणि क्रांतीशील विचारसरणीचे प्रणेते साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात साहित्य सम्राट गौरव महोत्सव उत्साहात साजरा होणार आहे. हा भव्य महोत्सव मंगळवार, दि. २९ जुलैपासून १ ऑगस्टपर्यंत दररोज विविध कार्यक्रमांसह रंगणार आहे. डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव केवळ सण नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवणारा एक आदर्श ठरणार आहे, असे आयोजकांनी सांगितले. समितीचे अध्यक्ष बळीराम गवते आणि सचिव सुनील पाटोळे यांनी बीडमधील नागरिकांना या गौरव सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या काळात दरवर्षी प्रमाणे यंदाही साहित्य दिंडी, विचारगोष्टी, सांस्कृतिक कार्यक्रम आशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.अण्णाभाऊ साठेंच्या विचारांचा जागर घडवणारा आणि तरुण पिढीला प्रेरणा देणारा हा महोत्सव बीडकरांसाठी अभिमानाचा ठरणार आहे.

### असे होणार कार्यक्रम



**साहित्य सम्राट गौरव महोत्सवात, मंगळवार दि.२९ जुलै रोजी सायं ६ वाजता ५०० महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सभागृह मैदान चांदणे वाडा येथे संपन्न होईल. बुधवार दि.३० जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता, सुप्रसिद्ध गायिका मंजुषा शिंदे यांचा संगीत रजनी कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे होणार आहे. शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता साहित्य दिंडी, कर्नाटक वाद्य प्रमुख आकर्षण, त्यानंतर सकाळी १० वाजता अण्णाभाऊ साठे पुतळा येथे ध्वजारोहण, जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पार पडणार आहे. सायंकाळी ५ वाजता भव्य मिरवणूक निघणार आहे.**

# लाडक्या बहिणींना या दिवशी मिळणार योजनेचा हप्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेअंतर्गत जुलै महिन्याच्या हप्ता राज्य सरकार लवकरच देणार आहे. राखीपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर (त्याआधीच) खात्यात पैसे जमा होतील हे नक्कीच आहे. पण यंदा जुलैसोबत ऑगस्ट महिन्याचा हप्ता राखीपौर्णिमनिमित्त मिळू शकतो अशी शक्यता आहे. त्यामुळे लाडक्या बहिणी आणि भावांचा रक्षाबंधन सण गोड होणार आहे.

जुलैचे पैसे कधी मिळणार ?




गेल्या वर्षी म्हणजेच २०२४ लाडकी बहिण योजना सुरु झाली आहे, या योजनेला आता एक वर्ष पूर्ण होत आहे. लाडकी बहिण योजनेची घोषणा झाल्यानंतर राज्यात २९ जून २०२४ पासून ही योजना कार्यान्वित झाली. गेल्या वर्षी २०२४ मध्ये रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर लाडक्या बहिणींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा पहिला हप्ता मिळाला होता. आता या योजनेचा नव्या वर्षातील तेराव्या हप्त्यांची महिलांना प्रतिक्षा आहे, हा हप्ता मिळायला थोडा उशीर होऊ शकतो त्याला प्रमुख कारण म्हणजे रक्षाबंधनाचा मुहूर्त .. कारण गेल्या वर्षी याच दिवशी पहिला हप्ता सरकारने लाभार्थ्यांना दिला होता, आताही हाच मुहूर्त राहू शकतो.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■



# सांगा आम्हाला 'माझी शाळा सुंदर शाळा' म्हणायचं तरी कसं ? वांगी येथील विद्यार्थ्यांचा सवाल

**भेगा पडलेल्या भिंती ,गळके पत्रे आणि वर्गात साचणारे पाणी शिक्षक विद्यार्थ्यांना झाडु आणि सुपली हातात घेऊन काढण्याची वेळ : डॉ.गणेश ढवळे**








### ●१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना माझी शाळा सुंदर शाळा म्हणायचं तरी कसं अशा प्रश्न पडला आहे.कारण भेगा पडलेल्या भिंती,गळके पत्रे आणि पावसाळ्यात दररोज शिक्षक आणि विद्यार्थ्यांना अगोदर झाडु आणि सुपली हातात घेऊन वर्गात साचलेले पाणी वर्गाबाहेर काढावे लागते. त्यामुळे केवळ रंगरंगोटी करुन शाळेच्या भिंतीवर माझी शाळा सुंदर शाळा लिहिल्याने आनंददायी शिक्षण मिळणार आहे का ? ? बीड जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीसाठी व नविन इमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा याकडे अजितदादा पवार पालकमंत्री,लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांचे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली १५ आगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार आहे.

शिक्षण विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे ; निधी मंजूर झाला की देऊ असे आश्वासन दिले जाते : धनवे निरंजन ( प्रभारी मुख्याध्यापक) वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची स्थापना १९५३ ची असुन वर्ग पहिली ते सातवी पर्यंत असलेल्या शाळेत १०५ विद्यार्थी पटसंख्या आहे. १० वर्गखोल्या असुन ६ शिक्षक कार्यरत असुन २ पदे रिक्त आहेत. शाळेच्या दुरावस्थेविषयी शिक्षण विभागाला लेखी कळवले असुन जिल्हा नियोजन मधुन निधी मंजूर होताच निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे ▶▶ उर्वरित पान २ वर

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाचे उद्‌घाटन

**बीड । प्रतिनिधी**



अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा अधिकाधिक लाभ, पात्र लाभार्थ्यांना व्हावा या उद्देशाने बीड शहरामध्ये महामंडळाच्या मराठवाड्यातील उपविभागीय कार्यालयाचे आज मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. याप्रसंगी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, श्रीक्षेत्र नारायणगडचे महंत शिवाजी महाराज, धनंजय देशमुख आदी उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रम जालना रोडवरील राजू कॉम्प्लेक्स येथे पार पडला. मराठा समाजाला आर्थिक सक्षम करायचे ध्येय असून त्यासाठी महामंडळाकडून अधिक मेहनत, परिश्रम घेण्यात येईल, असे पाटील यावेळी म्हणाले. या कार्यालयाच्या उद्घाटनानंतर यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मेळावाही पार पडला. मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमातही पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## देशाच्या शेवटच्या टोकापर्यंत रस्ते विकसित झाले पण पाटोद्याच्या मांजरा नदीच्या पुलावरील खड्ड्यांची परिस्थिती काय बदलना

**पाटोदा । प्रतिनिधी**

देशभरात महामार्ग, बायपास आणि अंतर्गत रस्त्यांचे जाळे निर्माण होत असताना, पाटोदा शहरातील मांजरा नदीवरील पूल मात्र कायम खड्ड्यांच्या विळख्यात अडकलेलाच आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या पुलावरील खड्ड्यांची परिस्थिती जैसे थे असून, नागरिकांचे हाल दिवसेंदिवस वाढतच आहेत.या पुलावर जागोजागी मोठ मोठे खड्डे असून, त्यात पावसाच्या पाण्याचे साचलेले डबके नागरिकांच्या डोळ्यात धूळ फेकणारे ठरत आहेत. पायी चालणाऱ्यांना दररोज या पाण्यातून वाट काढावी लागत असून, वाहन चालकांनाही धोकादायक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.रोजच्या प्रवासात वृद्ध, महिला व विद्यार्थ्यांना खड्ड्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा वाहनांची घसरण, स्लीप होणे आणि किरकोळ अपघात होत आहेत.स्थानिक प्रशासनाने या पुलाची डागडुजी करते मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. देश डिजिटल होत आहे, पण पाटोदा शहरातील पूल अजून खड्ड्यांत गाडलेला आहे, अशी तिखट प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली.पाटोदा शहराचा हा मुख्य पूल असून, याच मार्गावरून बाजारात ये-जा करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून सुरक्षित वाहतुकीसाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# संचालक दिपक घुमरे 'मराठवाडा आयकॉन पुरस्काराने' सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**



येथील नामांकित शिक्षण क्षेत्रातील व्यक्तिमत्व श्री दिपकदादा घुमरे यांनी बीड जिल्ह्यातील शिक्षण, सामाजिक,सांस्कृतिक व पर्यावरण आशा विविध क्षेत्रात अतुलनिय कार्य केले असल्याने त्यांना नवभारत,नवराष्ट्र प्रेस लि यांनी मराठवाडा आयकॉन पुरस्कार देवून दिनांक २० जुलै२०२५ रोजी हॉटेल रामा इंटरनॅशनल छत्रपती संभाजीनगर येथे समारंभात गौरविण्यात आले यावेळी विविध मान्यवरांच्या हस्ते नवभारत टाइम्सच्या वतीने दिपकदादा घुमरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दिपकदादा घुमरे यांनी वेगवेगळ्या शैक्षणिक सस्थाच्या माध्यमातून विविध सामाजिक, संस्कृतिक, पर्यावरणीय, कार्य या संस्थाच्या माद्यमातून करत आहेत. त्यांना हा बहुमोल असा पुरस्कार मिळाल्याबद्दल द बा घुमरे पब्लिक स्कूल बीड शाळेचे मुख्याध्यापक (मा) शेंडगे एम आर, जेष्ठ शिक्षक गव्हाणे बी एन, सचिन सुपेकर सर, सुनिल शेळके सर, जगताप अनिल सर, गव्हाणे अजय सर डावकर विजय सर, बांड सर श्री पानसरे राम दास आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा.

# गंगावाडी खून प्रकरणातील आरोपीची बीड कारागृहात रवानगी

**गेवराई । प्रतिनिधी**

प्रेम प्रकारातून शिवम शिकणे यांना पाच जणांनी मिळून मारहाण केली होती त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्या नंतर तलवाडा पोलिसात गुन्हाच गुन्हा नोंद करण्यात आला यातील पाचही आरोपी तलवाडा पोलिसांनी पकडले त्यांना रविवार रोजी गेवराई येथील न्यायालयासमोर उभे केले असता कोर्टाने त्यांची बीड कारागृहात रवानगी केली.

गेवराई तालुक्यातील गंगावाडी येथील शिवम चिकने या तरुणास गावातीलच एका तरुणी सोबत प्रेम संबंध असल्याचा संशय घेऊन मुलीचे वडील, भाऊ यांच्यासह इतर तीन मुख्य आरोपी यांनी बेदम मारहाण केली होती,मारहाणी नंतर शिवम यास प्रथम गेवराई येथील व तेथून जेजे रुग्णालयात छत्रपती संभाजी नगर याठिकाणी उपचारासाठी नेण्यात आले होते,परंतु मारहाण मोठ्या प्रमाणात झाली असल्याने



उपचारादरम्यान शिवम चिकने यांचा मृतू झाला या प्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात अगोदर मारहाणीचा तर मृत्यू झाल्यानंतर गुन्हाच गुन्हा दाखल करण्यात आला होता या पाच आरोपी पैकी सुरुवातीला तीन आरोपी पकडण्यात पोलिसांना यश आले होते व नंतर दोन आरोपी पकडण्यात आले या आरोपींना न्यायालयासमोर हजार ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हा वाहतुक शाखेची नेकनूर परिसरात कारवाई



## ●१०९ केसेस करुन ७३ हजाराचा ठोठावला दंड

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा वाहतुक शाखेच्या वतीने पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर अधिक्षक सचिन, जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, नेकनूर पोलीस स्टेशनचे गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर येथे आज आठवडी बाजार असल्याने बसस्टॅण्ड वरल मुख्य रस्त्याचा परिसरात वाहतुकीस अडथळा आणणार्या व वाहन नियमांचे उल्लंघन करणार्या १०९ वाहनधारकांवर कारवाई करुन ७३ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला व एकाविरुद्ध लायसन निलंबन प्रस्ताव पाठविण्याची तजवीज ठेवली आहे. वाहतुक शाखेने केलेल्या या कार्यवाहीमुळे बेकायदेशीर वाहनधारकांची धांदल उडाली होती.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, जिल्हा वाहतुक शाखेने आज विशेष मोहीम अंतर्गत नेकनूर परिसरात बेकायदेशीर वाहन धारकांना लगाम लागावा व वाहनाच्या नियमामध्ये सातत्य राहावे या हेतूने पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्या सहकार्यांने सकाळी १० वाजण्याच्या सुमारास नेकनूर परिसरात आज आठवडी बाजाराचा दिवस असल्याने रस्त्यावरील नो पार्कींग वाहनांवर व रस्त्यावर वाहने उभे करुन वाहतुकीस अडथळा आणणार्या वाहनांवर तसेच विमा नसणे, पीयुसी नसणे, लायसन्स नसणे, हेल्मेट नसणे या सदराखाली १०९ वाहनधारकांवर कारवाई करुन ७३ हजार रुपये दंड ठोठावला असून नियमभंग करणार्यांवर पोलीस कारवाई करण्यात आली आहे. या कामीच पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्यासह पोलीस हवालदार सखाराम, पोलीस नाईक आदिनाथ, पोलीस अंमलदार टुले, शेख, नेकनूर पो.स्टे.चे खाडे व कदम, पोलीस ड्रायव्हर नारायण यांनी सहभाग नोंदवला तसेच विनाकागदपत्रे वाहने चालवू नका, वाहनांचे नियम पाळा, वाहतुकीस विनाकारण अडथळा करु नका असे आवाहन जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांनी केले आहे.

## थोडक्यात

### अट्टल गुन्हेगाराची हर्सुल कारागृहात रवानगी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी करण्याचा प्रयत्न जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत करत आहेत. आपयरत अनेक गुंडांनी त्यांनी हर्सुल जेलमध्ये स्थानबद्दल केले आहे. बीड शहरातील एका गुंडास जेलबंद करून त्याची हर्सुल कारागृहामध्ये पाठवून देण्यात आले आहे. सोहेल खान समत खान (वय २७ रा.जुनी भाजी मंडई) याच्या विरूध्द अनेक गुन्हे आहेत. खुनाचा प्रयत्न, दुखापत, जिवे मारण्याची धमकी देणे यासह अन्य गुन्हे आहेत. सदरील या गुंडाविरोधात एमपीडीए कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली. त्यास पोलिसांनी पकडून हर्सुलच्या कारागृहामध्ये पाठवले आहे. सदरील ही कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शितलकुमार बल्लाळ, बाबा राठोड, सचिन अलगड, महादेव दराडे, गणपती राऊत, सिध्देश्वर मुरकुटे, अभिमन्यू अवताडे, अंकुश वरपे, युनूस बागवान, आश्पाक सय्यद, मनोज परजणे, बिभिषण चव्हाण यांनी केली आहे.

### बीड जिल्ह्यात २४ तासात ९ मि.मी. पाऊस

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात गेल्या दोन दिवसांपासून मध्यम आणि हलक्या स्वरुपाचा पाऊस पडत आहे. २४ तासात जिल्ह्यात १९.६ मि.मी. पाऊस पडला. यामध्ये बीड तालुक्यात १५.४, पाटोदा ८.६, आष्टी ३.३., गेवराई १२.९, माजलगाव १८.७, अंबाजोगाई २५.४, केज ४३.६, परळी २३.५, धारूर १३.५, वडवणी २०.२ आणि शिरूर कासार तालु३यात ५.८ मि.मि. पाऊस झाला आहे. या दोन दिवसाच्या पावसामध्ये खरीप पिकांना दिलासा मिळाला असला तरी तलावात पाणी जमा होण्याची मोठ्या पावसाची गरज आहे.

### कंकालेश्वर शाळेचा परिसर बनतोय नशेडींचा अड्डा

**बीड । प्रतिनिधी**

खंडेश्वरी परिसरातील कंकालेश्वर शाळा परिसरात नशेडीखोरांचा वावर वाढला आहे. शाळा सुटल्यानंतर नशा करणारे लोक या ठिकाणी बसून नशा करत आहेत. या शाळा परिसरास येण्यास सदरील नशाखोरांना पायबंद घालावा व त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी या परिसरातील नागरीकांतून केली जात आहे. खंडेश्वरी परिसरामध्ये कंकालेश्वर विद्यालय आहे. सदरील शाळा सुटल्यानंतर नशा करणारे लोक कंपाऊंडवरून उड्या मारून परिसरामध्ये जातात व त्या ठिकाणी नशा करत बसतात. याचा त्रास आजुबाजुच्या नागरीकांनाही सहन करावा लागत आहे. पेठ बीड पोलिसांनी याची दखल घेवून शाळा परिसरामध्ये नशा करणाऱ्या नशा खोरांची नशा उतरवावी अशी मागणी या भागातील नागरीकांकडून केली जात आहे.

### होळ येथून दुचाकी लंपास

**केज । प्रतिनिधी**

होळ (ता. केज) येथील अंगद महादेव राख या तरुणाची दुचाकी (एम. एच. ४४ ए.बी. ५३३१) त्याचे चुलते श्रीकृष्ण सूर्यभान राख हे गावातून येण्यासाठी घेऊन गेले. २३ जुलै रोजी रात्री ९ वाजता वैभव बियरबार येथून गावाकडे येत असताना दुचाकी स्लिप होऊन पडले. त्यानंतर त्यांनी दुचाकी तेथेच लावून दुसऱ्या दुचाकीवर आले. दुसऱ्या दिवशी दुचाकी लावलेल्या ठिकाणी आढळून न आल्याने तिचा शोध घेतला. मात्र ती दुचाकी मिळून आली नाही. ५५ हजार रुपये किंमतीची ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार अंगद राख याने दिल्यावरून अज्ञात चोरट्याविरुद्ध युसुफवडगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार अमजद सय्यद हे करीत आहेत.

### नेकनूर जवळ बसचे दोन्ही चाके पडले निखळून

**नेकनुर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर-लातूर ही महामंडळाची बस लातूरच्या दिशेने जात होती. बीड तालुक्यातील मांजरसुंबा आणि नेकनूरच्या दरम्यान दुपारी पोहोचली असता अचानक मागच्या बाजूचे दोन टायर एक पूर्वेला तर दुसरे पश्चिमेला निघून पडल्याची घटना आज शनिवार (दि.२६) रोजी दुपारी घडली. मांजरसुंबा-नेकनूर दरम्यान छत्रपती संभाजीनगर, लातूर बस क्रमांक एमएच २४ युयु ८३३५ या महामंडळाच्या एसटी बसचे दोन चाकं निखळुन पडल्याची घटना शनिवार (दि.२६) रोजी दुपारी घडली असून लातूर बस्थानकाचे भंडेराव सदाशिव चिवरे या चालकाच्या प्रसगांवधानामुळे ७० प्रवाशी बचावले. या दरम्यान मोठा अपघात झाला असता मात्र चालकाने प्रसंगावधान राखत बस नियंत्रणात आणत थांबवली. टायर निखळून पडले त्यावेळेला बस मधून ७० प्रवासी प्रवास करत होते. त्यानंतर प्रवाशांनी चालकाचे आभार मानले. मात्र भंगारात घालण्याची वेळ आलेल्या अनेक बसेस रस्त्यावर धावत असल्याने शेकडो प्रवाशांचे जीव धोक्यात आहेत.

### दुचाकीच्या डिक्कीतून दोन लाख रुपये लंपास

**केज । प्रतिनिधी**

एका शेतकऱ्याने चेकद्वारे बँकेतून अडीच लाखाची रक्कम काढून दोन पिशव्यात ठेवून पिशव्या दुचाकीच्या डिक्कीत ठेवल्या. मेडिकलवरून औषध घेऊन येईपयरत अज्ञात चोरट्याने डिक्की उघडून दोन लाख रुपये ठेवलेली पिशवी लंपास केली. तर दुसरी पिशवी तशीच ठेवल्याने ५० हजार रुपयांची रक्कम चोरीला गेली नाही. ही घटना केज शहरात घडली. बनकरंजा (ता. केज) येथील शेतकरी महेश शंकर नागरगोजे हे त्यांचे शेजारी उत्तरेश्वर नागरगोजे यांच्या मुलीचे कॉलेजला ऍडमिशन घेण्यासाठी २४ जुलै रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास केजला आले. महेश नागरगोजे यांनी चेकद्वारे शहरातील एसबीआय बँकेतून अडीच लाख रुपये काढले. त्यांनी दोन लाख रुपये एका पिशवीत व दुसऱ्या पिशवीत ५० हजार रुपये ठेवून दोन्ही पिशव्या दुचाकीच्या (एम. एच. ४४ एएफ ५५५३) डिक्कीत ठेवल्या. त्यानंतर महेश नागरगोजे व त्यांच्या सोबत असलेले उत्तरेश्वर नागरगोजे व त्यांची मुलगी ऋतुजा हे तिघे आईचे औषध आणण्यासाठी बसस्थानकापासून जवळ असलेल्या तांबवेश्वर मेडिकलवर दुचाकी रस्त्यावर उभी करून गेले. मेडिकलवर गर्दी असल्याने त्यांना औषध घेऊन येण्यास १५ ते २० मिनिटे लागले. तोपयरत पाळत ठेवून असलेल्या चोरट्याने दुचाकीची डिक्की उघडून डिक्कीत ठेवलेली २ लाख रुपयांची पिशवी घेऊन पोबारा केला. दुसरी पिशवी चोरट्याने तशीच ठेवल्याने ५० हजार रुपयांची रक्कम चोरीला गेली नाही. महेश नागरगोजे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे हे करीत आहेत.